**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ४२ दिनांक १६/०८/२०२४**

# स्वातंत्र्य दिनाचे अनुषंगाने “जनसंवाद अभियान” अंतर्गत केळवा पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबीराचे आयोजन

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या संकल्पनेतून पालघर जिल्ह्यात जनसंवाद अभियान चालू आहे. सदर जनसंवाद अभियानाच्या माध्यमातून विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली केळवा सागरी पोलीस ठाणे व रोटरी क्लब केळवा यांचे सहभागातुन स्वातंत्र्यादिनाचे अनुषंगाने दिनांक १५/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० वा. पर्यंत केळवा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील शितलाई मंगलधाम हॉल, केळवा येथे भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते.

केळवा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री. दत्ता शेळके व पोलीस ठाणेतील अंमलदार यांनी पोलीस ठाणे परिसरातील गावांमध्ये जाऊन नागरींकांमध्ये मोठया प्रमाणात जनसंवाद अभियानाच्या माध्यमातून जनजागृती करुन नागरीकांना रक्तदानाचे महत्व पटवुन दिले होते. त्यामुळे केळवा पोलीस ठाणे परीसरातील तरुण वर्ग व महिलांनी मोठया प्रमाणात रक्तदान शिबिरास प्रतिसाद दिला. केळवा पोलीस ठाणेचे एकूण २५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तसेच केळवा परीसरातील विविध गावातील पोलीस पाटील, सरपंच, सामाजीक कार्यकर्ते व नागरीक यांनी या शिबीरास हजेरी लावून एकूण ४४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. सदर शिबीरादरम्यान केळवा पोलीस ठाणेचे वतीने सर्व रक्तदात्यांना पुष्पगुच्छ देवुन प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रम हा श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. अभिजीत धाराशिवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पालघर विभाग, श्री. अविनाश मांदळे, पोलीस निरीक्षक, सफाळे पोलीस ठाणे, श्री. दत्ता शेळके, प्रभारी अधिकारी, केळवा सागरी पोलीस ठाणे तसेच केळवा पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार व रोटरी क्लबचे सर्व टीम यांनी हजर राहुन रक्तदान शिबीर कार्यक्रम यशस्वीरीत्या राबविला आहे.